# मिलरला दोष देणे अयोग्य

## शेवटून दुसऱ्या चेंडूवर धाव न घेण्याच्या निर्णयाचे गावस्करांकडून समर्थन

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

**इंडियन प्रीमियर** लीग (आयपीएल) ट्वेन्टी-२० क्रिकेटमधील गुजरात टायटन्सविरुद्धच्या चुरशीच्या सामन्यात शेवटून दुसऱ्या चेंडूवर एकेरी धाव काढण्यास नकार देण्याच्या डेव्हिड मिलरच्या निर्णयाचे भारताचे माजी कर्णधार सुनील गावस्कर यांनी समर्थन केले. दिल्ली कॅपिटल्स संघाला हा सामना अवघ्या एका धावेने गमवावा लागला असला, तरी मिलरला दोष देणे योग्य ठरणार नाही आणि त्याच्या हेतूवर प्रश्नही उपस्थित करता येणार नाही, असे गावस्कर म्हणाले.

डावखुऱ्या मिलरनेच (२० चेंडूंत नाबाद ४१) फटकेबाजी करताना दिल्ली संघाला विजयासमीप आणले होते. गुजरातने दिलेल्या २११ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना दिल्लीला अखेरच्या दोन चेंडूंवर दोन धावांची आवश्यकता होती. त्यावेळी मिलरने प्रसिध कृष्णाच्या गोलंदाजीवर एकेरी धाव नाकारली. मग निर्णायक चेंडूवर मिलरचा फटका चुकला आणि चेंडू थेट यष्टिरक्षक जोस बटलरकडे गेला. दिल्लीच्या फलंदाजांनी धाव काढण्याचा प्रयत्न केला, पण बटलरने यष्टींचा अचूक वेध घेत कुलदीप यादवला धावचीत केले. त्यामुळे दिल्लीचा संघ विजयापासून वंचित राहिला. मात्र, मिलर ज्या प्रकारे फटकेबाजी करत होता ते पाहता, त्याला 'स्ट्राइक' स्वतःकडे ठेवणे अधिक योग्य वाटले असावे, असे मत गावस्करांनी नोंदवले.

''मिलरला स्वतःच्या क्षमतेवर विश्वास होता. तो चेंडू चांगल्या प्रकारे मारत होता आणि आपण अखेरच्या चेंडूवर सामना संपवू शकतो, असे त्याला वाटत होते. त्याच्या हेतूवर तुम्ही टीका करू शकत नाही. मात्र, शेवटी अंमलबजावणी महत्त्वाची ठरते. प्रसिध कृष्णाने योग्य उंचीवर अचूक 'स्लोअर बाऊंसर' टाकला, ज्यामुळे मिलरला फटका मारणे कठीण गेले. निर्णायक क्षणी अशा छोट्या-छोट्या गोष्टींनी सामन्याला निकाल ठरतो,'' असे गावस्कर यांनी 'जिओ हॉटस्टार'शी बोलताना सांगितले.

उच्च दबावात परिस्थिती ओळखून खेळणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचेही गावस्कर यांनी नमूद केले. यावेळी गावस्कर यांनी १९८६ सालच्या भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यातील चेन्नई कसोटीची आठवण सांगितली. या सामन्यात भारताला ३४८ धावांचे लक्ष्य गाठायचे होते. त्या वेळी रवी शास्त्री यांनी नाबाद ४८ धावा करत योग्य क्षणी एकेरी घेतली आणि भारताला बरोबरीत आणले. शेवटी मनिंदर सिंग बाद झाल्याने सामना बरोबरीत संपला.

''सामन्याच्या निर्णायक टप्प्यावर नेहमीच खूप दडपण असते. अशा वेळी खेळाची समज फार महत्त्वाची ठरते. त्या बरोबरीत सुटलेल्या कसोटी सामन्यात रवीने योग्य वेळी एकेरी घेतली होती. या सामन्यात (दिल्ली विरुद्ध गुजरात) मिलरनेही एकेरी घेतली असती तर तो कदाचित अधिक योग्य निर्णय ठरला असता. मात्र, तो ज्या सहजतेने फटके मारत होता ते पाहता, 'स्ट्राइक' स्वतःकडे ठेवल्याने त्याला पूर्ण दोषही देता येणार नाही,'' असे गावस्कर म्हणाले.



### मिलरच्या निर्णयानंतर विश्वास वाढला - गिल

■ शेवटून दुसऱ्या चेंडूवर मिलरने एकेरी धाव नाकारणे आमच्यासाठी निर्णायक ठरले. त्यानंतर आमचा विश्वास वाढला. आम्ही सामना जिंकू शकतो असे आम्हाला वाटू लागले, असे प्रतिस्पर्धी संघ गुजरातचा कर्णधार शुभमन गिल म्हणाला. सलग दोन पराभवानंतर गुजरातने आपले विजयाचे खाते उघडले.

■ "आमचे तीनही सामने शेवटच्या चेंडूपर्यंत रंगले आहेत. पहिल्या दोन सामन्यांत आम्हाला सकारात्मक निकाल मिळवता आला नाही. मात्र, यावेळी अंतिम रेषा पार केल्याचे समाधान आहे. मिलरने धाव नाकारल्यानंतरच आमच्यात विजय मिळवण्याचा विश्वास निर्माण झाला," असे गिलने नमूद केले.

### बंगळूरु-राजस्थान आज आमनेसामने

गुवाहाटी : यंदाच्या 'आयपीएल' हंगामाची दमदार सुरुवात करताना आपले सर्व सामने जिंकणारे राजस्थान रॉयल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु हे तुल्यबळ संघ आज, शुक्रवारी समोरासमोर येणार आहे. यावेळी राजस्थानला यशस्वी जैस्वाल आणि वैभव सूर्यवंशी या सलामीवीरांकडून, तर बंगळूरुला लयीत असलेल्या देवदत्त पडिक्कलकडून सर्वाधिक अपेक्षा असतील. गतविजेत्या बंगळूरु संघाने सलग दोन विजयांसह, तर राजस्थानने सलग तीन विजयांसह नव्या हंगामाची सुरुवात केली आहे. त्यामुळे दोन्ही संघ संभाव्य विजेते म्हणून समोर आले आहेत.

● **वेळ** : सायं. ७.३० वा.
● **थेट प्रक्षेपण** : स्टार स्पोर्ट्स १, १ हिंदी, जिओहॉटस्टार ॲप.

# लखनऊच्या विजयात मुकुलची चमक

**कोलकाता** : युवा फलंदाज मुकुल चौधरी (२७ चेंडूंत नाबाद ५४) आणि आयुष बदोनी (३४ चेंडूंत ५४) यांच्या निर्णायक अर्धशतकांच्या जोरावर लखनऊ सुपर जायंट्सने गुरुवारी झालेल्या 'आयपीएल' सामन्यात कोलकाता नाइट रायडर्स संघावर तीन गडी राखून विजय मिळवला. लखनऊचा हा सलग दुसरा विजय ठरला, तर कोलकाताचा हा चार सामन्यांत तिसरा पराभव होता.

कोलकाताने दिलेल्या १८२ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना लखनऊची सुरुवात चांगली झाली नाही. मात्र, आयुष व अखेरीस मुकुल यांच्या खेळीमुळे लखनऊने २० षटकांत ७ बाद १८२ धावा करत विजय साकारला. मुकुलने आपल्या खेळीत दोन चौकार आणि सात षटकारांची आतषबाजी केली. कोलकाताकडून वैभव अरोरा (२/३८) व अनुकुल रॉय (२/३२) यांनी समाधानकारक गोलंदाजी केली. कॅमरून ग्रीनने यंदाच्या हंगामात प्रथमच गोलंदाजी करताना दोन षटकांत २८ धावा देत एक गडी बाद केला.

त्यापूर्वी, प्रथम फलंदाजी करणाऱ्या कोलकाताने अंगक्रिश रघुवंशी (३३ चेंडूंत ४५), कर्णधार अजिंक्य रहाणे (२४ चेंडूंत ४१), रोव्हमन पॉवेल (२४ चेंडूंत नाबाद ३९) आणि ग्रीन (२४ चेंडूंत नाबाद ३२) यांच्या खेळीमुळे २० षटकांत ४ बाद १८१ अशी धावसंख्या उभारली.

# आशियाई बॉक्सिंगमध्ये भारताचा सुवर्ण चौकार

## मीनाक्षी, प्रीती, प्रिया, अरुंधतीची चमक; अल्फियाला रौप्य

**वृत्तसंस्था, उलानबटार**



मीनाक्षी हुडा | प्रीती पवार | प्रिया घंघास | अरुंधती चौधरी

**भारताच्या महिला** बॉक्सिंगपटूंनी चमकदार कामगिरी करताना आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई केली. जागतिक विजेती मीनाक्षी हुडा (४८ किलो), आशियाई क्रीडा स्पर्धेतील कांस्यपदक विजेती प्रीती पवार (५४ किलो), प्रिया घंघास (६० किलो) आणि अरुंधती चौधरी (७० किलो) यांनी सोनेरी यश संपादन केले. तसेच अल्फिया पठाणला (८० किलोहून अधिक) रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

मंगोलिया येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत ५७ किलो वजनी गटात सध्याची जगज्जेती जॅस्मिन लम्बोरियाने निराशा केली. तिला थायलंडच्या दोन वेळच्या जागतिक विजेत्या पुनरावी रुएनरोसकडून ०-५ अशा पराभवाचा सामना करावा लागला. अल्फियाला दीना इस्लम्बेकोवाकडून ०-५ असा पराभव पत्करावा लागला. भारतीय महिला संघाने या स्पर्धेत चमकदार कामगिरी करताना चार सुवर्ण, दोन रौप्य आणि चार कांस्यपदकांसह एकूण १० पदके मिळवली.

मीनाक्षीने यजमान मंगोलियाच्या नोमुंडारी एन्ख अमगलानला ५-० अशा फरकाने नमवत भारताला दिवसातील पहिले सुवर्णपदक मिळवून दिले. प्रीतीने तीन वेळच्या जगज्जेत्या हुआंग शियाओ-वेनला ५-० असे पराभूत केले. यानंतर प्रियाने उत्तर कोरियाच्या वॉन उन-ग्योंगवर ३-० असा विजय मिळवला. अरुंधतीने अंतिम सामन्यात कझाकस्तानच्या बकित सेइडिशला ४-१ असे पराभूत करण्याची कामगिरी केली.

त्यापूर्वी, निकहत झरीन (५४ किलो), अंकुशिता बोरो (६५ किलो), लवलिना (७५ किलो) आणि पूजा (८० किलो) यांना कांस्यपदकावर समाधान मानावे लागले होते. विश्वनाथ सुरेश (४८ किलो) आणि सचिन सिवाच (६० किलो) हे शुक्रवारी पुरुष गटात आपापली अंतिम लढत खेळतील.

# महिला कम्पाऊंड तिरंदाजी संघ अंतिम फेरीत

**मेक्सिको** : भारतीय महिला कम्पाऊंड तिरंदाजी संघाने उत्कृष्ट कामगिरी करताना विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. 'लोकसत्ता तरुण तेजांकित' पुरस्कार विजेती मधुरा धमणगावकर, ज्योती सुरेखा वेन्नम आणि प्रगती या अग्रमानांकित त्रिकुटाने उपांत्य फेरीत तुर्कीवर २३३-२३० असा विजय मिळवला. आता सुवर्णपदकासाठी त्यांची शुक्रवारी अमेरिकेशी लढत होणार आहे. उपांत्यपूर्व फेरीत भारताने डेन्मार्कवर २३५-२३४ अशी मात केली होती.


पुरुष गटात अग्रमानांकित भारतीय संघाला उपांत्यपूर्व फेरीतच हार पत्करावी लागली. अभिषेक वर्मा, ओजस देवताळे आणि साहिल जाधव यांच्या संघाला मेक्सिकोने २३२-२३४ असे पराभूत केले.

वैयक्तिक प्रकारात भारताचे सहा कम्पाऊंड तिरंदाज 'अंतिम ३२' फेरीत पोहोचले.






# जावोखिर सिंदारोवचा प्रज्ञानंदवर विक्रमी विजय



**पाफोस** : उझबेकिस्तानच्या जावोखिर सिंदारोवने अप्रतिम कामगिरी सुरू ठेवताना 'कँडिडेट्स' बुद्धिबळ स्पर्धेच्या दहाव्या फेरीत गुरुवारी भारताच्या आर. प्रज्ञानंदला नमवले. सिंदारोवचा हा विजय विक्रमी ठरला. एका 'कँडिडेट्स' सर्वाधिक सहा विजय आता सिंदारोवच्या नावे झाले आहेत. दहा फेऱ्यांअंती आठ गुणांसह त्याने अग्रस्थान भक्कम केले आहे.

महिलांमध्ये भारताच्या दिव्या देशमुखला पराभवाचा सामना करावा लागला. तिला ॲलेक्सांड्रा गोर्याचकिनाने पराभूत केले. भारताची अन्य ग्रँडमास्टर आर. वैशालीने युक्रेनच्या ॲना मुझिचुकला बरोबरीत रोखले. त्यामुळे महिला गटात वैशालीने सहा गुणांसह आघाडी घेतली आहे. चीनची झू जिनेर आणि मुझिचुक ५.५ गुणांसह संयुक्त दुसऱ्या स्थानी आहेत. दहाव्या फेरीत जिनेरला बिबिसारा असाऊबायेवा हिच्याकडून पराभव पत्करावा लागला. कॅटरिना लायनो आणि टॅन झोंगयीतील लढत बरोबरीत सुटली.

खुल्या विभागात, सिंदारोवने पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळताना प्रज्ञानंदवर मात केली. त्याचा हा स्पर्धेतील सहावा विजय ठरला. त्यामुळे त्याने सर्वाधिक विजयांचा गुकेश आणि हिकारू नाकामुरा (२०२४), इयन नेपोम्नियाशी (२०२०-२१ आणि २०२२), फॅबियानो कारुआना (२०१८) आणि मॅग्नस कार्लसन (२०१३) यांचा पाच विजयांचा विक्रम मोडीत काढला. यंदा स्पर्धेतील दहाव्या फेरीत कारुआना आणि वेई यी, नाकामुरा आणि गिरी, तसेच आंद्रे एसिपेन्को आणि माथियस ब्लुबाऊम यांच्यातील लढत बरोबरीत सुटली.

# आयुष उपांत्यपूर्व फेरीत

**निंगबो (चीन)** : भारताचा युवा बॅडमिंटनपटू आयुष शेट्टीने आशिया अजिंक्यपद स्पर्धेतील घोडदौड कायम राखताना गुरुवारी पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळवले. त्याच वेळी पीव्ही सिंधू आणि एचएस प्रणॉय यांचे आव्हान मात्र संपुष्टात आले.

जागतिक क्रमवारीत २५व्या स्थानी असणाऱ्या आयुषने २०व्या स्थानी असणाऱ्या चायनिज तैपेइच्या चि यू जेनला २१-१६, २१-१२ असे सरळ गेममध्ये नमविले. पुढच्या फेरीत त्याच्यासमोर तिसऱ्या मानांकित इंडोनेशियाच्या जॉनथन क्रिस्टीचे आव्हान असेल.

भारताच्या अन्य खेळाडूंनी निराशाजनक कामगिरी केली. सिंधूला दुसऱ्या मानांकित चीनच्या वांग झी यी हिच्याकडून १८-२१, १८-२१ असे पराभूत व्हावे लागले. महिलांच्या अन्य लढतीत उन्नती हुडाला जपानच्या तोमोका मियाझाकीकडून १७-२१, ९-२१ अशी हार पत्करावी लागली. प्रणॉयला चीन वेंग होंग यांगने १२-२१, १९-२१ असे पराभूत केले.







punjab national bank — Together for the better

**भारग्रस्त मत्ता व्यवस्थापन शाखा, मुंबई**
पीएनबी प्रगती टॉवर, पहिला मजला, प्लॉट सी-9, ब्लॉक जी, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - 400051,
ईमेल- zs8356@pnb.bank.in

**अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) मधील तरतुदीसह वाचण्यात येणारया सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना**

याद्वारे कर्जदार व जामीनदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण/ भारग्रस्त असलेल्या खालील वर्णनाच्या अचल मालमत्तेचा सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारयांनी **सांकेतिक ताबा** (सीजेएम कोर्टाद्वारे प्रत्यक्ष ताब्याचे आदेश प्राप्त झाले आहेत) घेतलेला असून तिची कर्जदार व जामीनदार यांचेकडून सुरक्षित धनकोस घेणे असलेल्या थकबाकीच्या वसुलीसाठी **दि. 28.04.2026 रोजी सका. 11.00 ते दु. 04.00 वाजेपर्यंत** आवश्यक असल्यास 10 मिनिटांच्या काल-विस्तारासह ''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे'' तत्त्वावर विक्री करण्यात येईल.
आरक्षित किंमत व बयाणा रक्कम खालील तक्त्यात सदर मालमत्तांच्या समोर नमूद करण्यात आली आहे.

**अनामत मत्तेचे वर्णन**

| अ. क्र. | शाखेचे नाव / खात्याचे नाव / कर्जदार/जामीनदार खात्याचे नाव आणि पत्ता | तारण अचल मालमत्तांचे वर्णन / मालकाचे नाव (मालमत्तांचे गहाणकार) | अ) सर्फेसी अधिनियम 2002 मधील अनुच्छेद 13(2) अंतर्गत मागणी सूचना दिनांक ब) 30.06.2025 रोजीची थकबाकी रक्कम क) सर्फेसी अधिनियम 2002 मधील अनुच्छेद 13(4) अंतर्गत ताबा सूचना ड) ताब्याचे स्वरूप सांकेतिक / प्रत्यक्ष / रचनात्मक | अ) आरक्षित किंमत ब) बयाणा रक्कम क) बोली वृद्धी रक्कम | ई-लिलाव दिनांक / वेळ | सुरक्षित धनको यांना ज्ञात असलेल्या बोज्यांचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | एसएएमबी, मुंबई<br>पीएनबी प्रगती टॉवर, पहिला मजला, जी-ब्लॉक, सी-9, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई- 400051. मेल: zs8356@pnb.bank.in<br>i) मे. सिंध गारमेंट्स (कर्जदार)<br>ii) श्री. संजय प्रेमचंद हरवानी (भागीदार / गहाणकार आणि दिवंगत श्री. प्रेमचंद नरुमल हरवानी, गहाणकार मृत असल्याने त्यांचे कायदेशीर वारस)<br>iii) श्री. संकल्प संजय हरवानी (भागीदार)<br>iv) श्री. अनिल प्रेमचंद हरवानी (जामीनदार / गहाणकार आणि तसेच कायदेशीर वारस<br>v) श्री श्यामलाल चंदनमल नोटवानी (जामीनदार / गहाणकार)<br>vi) श्रीमती रेखा श्यामलाल नोटवानी (जामीनदार / गहाणकार)<br>vii) श्री. प्रमोद मोतीरामजी राठोड (जामीनदार / गहाणकार)<br>viii) श्री. दिलीप रिधोमल हरवानी (जामीनदार / गहाणकार)<br>ix) श्रीमती भावना अनिल कपूर (जामीनदार) | **मालमत्ता 1**<br>निवासी बिल्डींग प्लॉट क्र. 28 (पूर्व भाग), क्षेत्रफळ सुमारे 1542.60 चौ.फु., शेत सर्वे क्र. 7/2 आणि 25/2, मौजा राजापेठ, सेवानी मॅटरनिटी हॉस्पिटल जवळ, दस्तूर नगर रोड, दौलत दीप नगर, बापू कॉलनी, अमरावती, तहसील आणि जिल्हा अमरावती. मालकः श्री. प्रमोद मोतीरामजी राठोड | अ) 13.02.2025<br>ब) रु. 27.65 कोटी + एनपीए दिनांकापासूनचे पुढील व्याज व शुल्के.<br>क) 04.06.2025<br>ड) सांकेतिक ताबा (सीजेएम कोर्टाद्वारे प्रत्यक्ष ताब्याचे आदेश प्राप्त झाले आहेत) | अ) रु. 77,71,000/-<br>ब) रु. 7,77,100/-<br>क) रु. 50,000/- | 28/04/2026 रोजी सका. 11:00 ते दु. 04:00 वाजेपर्यंत | ज्ञात नाही |
| | | **मालमत्ता क्र. 2**<br>निवासी सदनिका क्र. 202, पहिला मजला, सरस्वती वास अपार्टमेंट, प्लॉट क्र. 30 मध्ये 10% अविभाजित हिस्सा, क्षेत्रफळ सुमारे 4230 चौ.फु. (392.979 चौ.मी.), सर्वे क्र. 81, मौजा राजापेठ, आईस फॅक्टरी जवळ, अमरावती, तहसील आणि जिल्हा अमरावती.<br>मालक- श्री. दिलीपकुमार रिधोमल हरवानी | अ) 13.02.2025<br>ब) रु. 27.65 कोटी + एनपीए दिनांकापासूनचे पुढील व्याज व शुल्के.<br>क) 04.06.2025<br>ड) सांकेतिक ताबा (सीजेएम कोर्टाद्वारे प्रत्यक्ष ताब्याचे आदेश प्राप्त झाले आहेत) | अ) रु. 27,28,000/-<br>ब) रु. 2,72,800/-<br>क) रु. 50,000/- | 28/04/2026 रोजी सका. 11:00 ते दु. 04:00 वाजेपर्यंत | ज्ञात नाही |
| | | **मालमत्ता क्र. 3:**<br>व्यावसायिक दुकान क्र. 118, पहिला मजला, श्री बालाजी मार्केट कॉम्प्लेक्स, महानगर पालिका घर क्र. 342 ए (भाग), वॉर्ड क्र. 26ए, बिल्ट-अप क्षेत्रफळ 236.174 चौ.फु. (21.941 चौ.मी.), दुकान क्र. 222, दुसरा मजला, श्री बालाजी मार्केट कॉम्प्लेक्स, महानगर पालिका घर क्र. 342 टी (भाग), वॉर्ड क्र. 26ए आणि बिल्ट-अप क्षेत्रफळ 209.064 चौ.फु. (19.422 चौ.मी.), प्लॉट क्र. 77/2 आणि 77/2/एबीसी, महानगर पालिकेच्या हद्दीत, आम्रपाली हॉटेल जवळ, जवाहर रोड, अमरावती, तहसील आणि जिल्हा अमरावती.<br>मालकः डॉ. श्री अनिल प्रेमचंद हरवानी | अ) 13.02.2025<br>ब) रु. 27.65 कोटी + एनपीए दिनांकापासूनचे पुढील व्याज व शुल्के.<br>क) 04.06.2025<br>ड) सांकेतिक ताबा (सीजेएम कोर्टाद्वारे प्रत्यक्ष ताब्याचे आदेश प्राप्त झाले आहेत) | अ) रु. 22,18,000/-<br>ब) रु. 2,21,800/-<br>क) रु. 50,000/- | 28/04/2026 रोजी सका. 11:00 ते दु. 04:00 वाजेपर्यंत | ज्ञात नाही |
| | | **मालमत्ता क्र. 4**<br>निवासी बंगलो प्लॉट क्र. 04 (भाग) आणि प्लॉट क्र. 5, एकूण क्षेत्रफळ सुमारे 3422.00 चौ.फु. (318.96 चौ.मी.), सर्वे क्र. 88 (नवीन), हरवानी हॉस्पिटल जवळ, दस्तूर नगर रोड, विवेकानंद कॉलनी, अमरावती, तहसील आणि जिल्हा अमरावती.<br>मालकः श्री. संजय कुमार प्रेमचंद हरवानी | अ) 13.02.2025<br>ब) रु. 27.65 कोटी + एनपीए दिनांकापासूनचे पुढील व्याज व शुल्के.<br>क) 04.06.2025<br>ड) सांकेतिक ताबा (सीजेएम कोर्टाद्वारे प्रत्यक्ष ताब्याचे आदेश प्राप्त झाले आहेत) | अ) रु. 2,42,05,000/-<br>ब) रु. 24,20,500/-<br>क) रु. 1,00,000/- | 28/04/2026 रोजी सका. 11:00 ते दु. 04:00 वाजेपर्यंत | ज्ञात नाही |
| | | **मालमत्ता क्र. 5**<br>व्यावसायिक दुकान क्र. 401 ते 420, चौथा मजला, बिल्ट-अप क्षेत्रफळ 363.82 चौ.मी., ड्रीम्स लँडमार्क या इमारतीत, प्लॉट क्र. 127/4, 123(भाग)एम, 127/5, 124/2, 122 (भाग), अमरावती -बडनेरा मेन रोड, राजकमल चौक, अमरावती, तहसील आणि जिल्हा अमरावती.<br>मालकः मे. ड्रीम्झ इन्फ्रास्ट्रक्चर द्वारे त्यांचे भागीदार श्री. संजय प्रेमचंद हरवानी आणि श्री नरेंद्र गोपीचंद हरवानी | अ) 13.02.2025<br>ब) रु. 27.65 कोटी + एनपीए दिनांकापासूनचे पुढील व्याज व शुल्के.<br>क) 04.06.2025<br>ड) सांकेतिक ताबा (सीजेएम कोर्टाद्वारे प्रत्यक्ष ताब्याचे आदेश प्राप्त झाले आहेत) | अ) रु. 3,01,15,000/-<br>ब) रु. 30,11,500/-<br>क) रु. 1,00,000/- | 28/04/2026 रोजी सका. 11:00 ते दु. 04:00 वाजेपर्यंत | ज्ञात नाही |
| | | **मालमत्ता क्र. 6**<br>व्यावसायिक दुकान क्र. बी6-001 ते बी-6-040, एकूण चटई क्षेत्रफळ सुमारे 3468.80 चौ.मी. आणि बिल्ट-अप क्षेत्रफळ सुमारे 3762.14 चौ.मी. (40495.67 चौ.फू.), तळ मजला आणि पहिला मजला (या मेझनीन/पहिल्या मजल्याचा समावेश आहे), त्यापैकी विंग-बी, ड्रिम्झलँड बिजनेस पार्क, मौजे बोरगाव, प्रगणे नांदगाव पेठ, तहसील व जिल्हा अमरावती.<br>सर्व दुकाने आतून एकमेकांना जोडलेली आहेत आणि ते एकच युनिट/शोरूम आहे असे समजण्यात येते.<br>मळकः श्री प्रेमचंद नारुमल हरवानी, श्री संजय प्रेमचंद हरवानी (द्वारे आममुखत्यार श्री विकी रुपचंद शादी) | अ) 13.02.2025<br>ब) रु. 27.65 कोटी + एनपीए दिनांकापासूनचे पुढील व्याज व शुल्के.<br>क) 04.06.2025<br>ड) सांकेतिक ताबा (सीजेएम कोर्टाद्वारे प्रत्यक्ष ताब्याचे आदेश प्राप्त झाले आहेत) | अ) रु. 10,86,38,000/-<br>ब) रु. 1,08,63,800/-<br>क) रु. 5,00,000/- | 28/04/2026 रोजी सका. 11:00 ते दु. 04:00 वाजेपर्यंत | ज्ञात नाही |

**अटी व शर्तीः**
सदर विक्री ही सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मध्ये विहित करण्यात आलेल्या अटी व शर्ती आणि पुढील अटींच्या अधीन राहून करण्यात येईलः
1. सदर मालमत्तांची विक्री ही ''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे'' तत्त्वावर करण्यात येत आहे.
2. वर नमूद अनामत मत्तेचे तपशील प्राधिकृत अधिकारयांच्या माहितीनुसार असले तरीही सदर सूचनेत काही चूक झाल्यास, चुकीचे विधान छापण्यात आल्यास किंवा काही सुटल्यास त्यासाठी प्राधिकृत अधिकारी जबाबदार नसतील.
3. सदर विक्री ही ई-लिलाव प्लॅटफॉर्मची वेबसाईट https://baanknet.com च्या माध्यमातून दि. 28.04.2026 रोजी स. 11.00 ते दु. 04.00 वाजेपर्यंत करण्यात येईल.
4. विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया येथे भेट द्यावीः https://baanknet.com.

**दिनांकः 10.04.2026**
**स्थानः मुंबई**

**प्राधिकृत अधिकारी**
**पंजाब नॅशनल बँक सुरक्षित धनको**

**सर्फेसी अधिनियम, 2002 मधील नियम 8(6) अंतर्गत वैधानिक विक्री सूचना**


हे पत्र **मुद्रक आणि प्रकाशक विरेंद्र विद्याधर रानडे** यांनी मालक, दि इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - दि इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड), यांच्यासाठी लोकमत, प्लॉट नं. ११२, २०७ आणि २०८, एमआयडीसी इंडस्ट्रियल एरिया, बुटीबोरी, नागपूर-४४११०८ येथे छापून प्लॉट. नं. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, अंबाझरी ले-आऊट, अंबाझरी, नागपूर-४४००१० येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी क्रमांक : २२३०४२१, २२३६८९७, फॅक्स क्रमांक : २२३६९८६.
**लोकसत्ता मुंबई कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. दूरध्वनी : ०२२-६७४४०००० फॅक्स : ०२२-२२८२२१८७. **महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३१९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४. दूरध्वनी : ०२०-६७२४१०००, फॅक्स : ०२०६७२४११४७. ■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **निवासी संपादक : देवेंद्र गावंडे*** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Loksatta, RNI. No. 54743/92, Dated 30-4-92.
© दि. इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.